ePaper
|| वर्ष - 7 | अंक - 340 || UDYAM-MH-26-0158827 ||
# महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार, दिनांक 28 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शशिकांत शिंदेंना अटक झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात संघर्ष करू; शरद पवार



### आतील पानांत


- राजस्थानचा लखनऊ सुपरजायंट्सवर 'रॉयल' विजय
- मोदी विश्वनेते, नाद करायचा नाही
- राज्यातील कांदा निर्यातीला परवानगी!
- पिंपरी, तळेगाव, चाकणमध्ये 'बत्तीगुल'!


## मालमत्ता कर बिले वाटपाचा 'श्रीगणेशा'

# कर संकलन विभागाचा आता "सिध्दी 2.0"!

### 'ओटीपी'द्वारे मोबाईल क्रमांक व्हेरिफाय करण्याचे आवाहन

| पुणे | महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: गतवर्षी महिला बचत गटाच्या वतीने मालमत्ता कराची बिले वाटपाचा निर्णय यशस्वी झाल्यानंतर 2024-25 या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी ओटीपीद्वारे आपल्या मालमत्तेचा जोडलेला मोबाईल क्रमांक व्हेरिफाय करावा, असे आवाहनही महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.**




### 75 हजार थकबाकीदारांना जप्ती पूर्व नोटीसा

» 31 मार्च 2023 अखेर शहरातील 75 हजार 858 मालमत्ता धारकांकडे दहा हजार पेक्षा जास्त रक्कम थकीत आहे. या मालमत्ता धारकांकडे तब्बल 717 कोटी 32 लाख रुपयांची थकबाकी आहे. या मालमत्ता धारकांना बिलाबरोबरच जप्ती पूर्व नोटीसा देण्यात येत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात 6 लाख 25 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सव्वा सहा लाख बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. या वर्षी प्रथमच बिलावर युपिक आयडी छापण्यात आला आहे.

पालिकेमार्फत चालू असलेल्या सर्वेक्षणात ज्या मालमत्तांचे सलग क्रमांक (GEO -SEQUENCING) देऊन झाले आहेत त्या मालमत्तांच्या बीलावर युपिक आयडी दिलेला आहे. हा लक्षात ठेवण्यासाठी सोपा असून पुढील वर्षापासून सर्व मालमत्तांना युपिक आयडी दिलेला असेल. महापालिकेच्या सर्व सेवा सुलभ मिळण्यासाठी याचा नागरिकांना भविष्यात फायदा होणार आहे.

**मतदान जागृतीत कर संकलन विभागाचाही हातभार**

पिंपरी-चिंचवड शहर हे मावळ, शिरूर आणि बारामती या तीन लोकसभा मतदारसंघात विभागले आहे. कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्ता करांची बिले वाटत असतानाच जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिलेले मतदान जनजागृतीचे पॅम्प्लेटही घरोघर देण्यात येत आहे.

## श्रीरंग बारणेंच्या विजयासाठी भाजपा मैदानात!

### » शंकर जगताप : चिंचवडमध्ये दोन लाखांचे लीड मिळेल!

| थेरगाव | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना चिंचवड विधानसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीपेक्षा दुप्पट मताधिक्य मिळेल. सुमारे पावणेदोन ते दोन लाख मतांच्या फरकाने ते विजयी होतील, असा विश्वास पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आज (शुक्रवारी) व्यक्त केला.**




मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार यांच्या प्रचारार्थ थेरगाव येथील संतोष मंगल कार्यालयात झालेल्या नमो संवाद सभेत ते बोलत होते. त्यावेळी खासदार बारणे, भाजपचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, माजी नगरसेवक सिद्धेश्वर बारणे, अभिषेक बारणे, हर्षल ढोरे तसेच प्रसाद कस्पटे, पियुशा पाटील, नितीन बारणे, रवी भिलारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न...

» प्रचंड उन्हामुळे मतदानाची टक्केवारी कमी होत असल्याबद्दल खासदार बारणे यांनी चिंता व्यक्त केली. विदर्भामध्ये 42-43% मतदान झाले आहे. विक्रमी मताधिक्याच्या गोष्टी करताना मतदानाची टक्केवारी वाढेल, यासाठी कार्यकर्त्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, अशी सूचनाही शंकर जगताप यांनी केली.

शंकर जगताप म्हणाले की, गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात घडवलेल्या अमूलाग्र बदलांमुळे नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदाची तर बारणे यांची खासदारकीची हॅटट्रिक निश्चित आहे. भारतात 400 पेक्षा अधिक खासदार निवडून आणताना त्यात बारणे यांना पुन्हा संसदेत पाठवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. गेल्या निवडणुकीत चिंचवड विधानसभा मतदारसंघातून बारणे यांना सर्वाधिक 96 हजारांचे मताधिक्य मिळाले होते.

# पुण्याच्या आरोग्य सुविधांना ‘बूस्टर’!

## मुरलीधर मोहोळ : बिबवेवाडीत साकारतेय 500 बेडचे अत्याधुनिक रुग्णालय

| पुणे | महाईन्यूज |
विशेष प्रतिनिधी

बिबवेवाडी येथील ईएसआयसी अर्थात कामगार विमा रुग्णालयात 100 बेडचे सुसज्ज रुग्णालय कार्यान्वित झाले असून 16 एकर जागेतील सात मजली इमारतीत 500 खाटांचे सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज विस्तारीत रुग्णालयाचे काम नजिकच्या काळात पूर्ण होईल. त्यामुळे पर्वती, बिबवेवाडी, सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असे मत भाजप महायुतीचे पुणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.






पर्वती विधानसभा मतदारसंघातील आंबेडकर नगर, आदिनाथ सोसायटी, प्रेमनगर, गंगाधाम, मार्केट यार्ड बस डेपो, महेश सोसायटी, चिंतामणीनगर, अप्पर इंदिरानगर आदी परिसरात मोहोळ यांच्या प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार माधुरी मिसाळ, आमदार सुनील कांबळे, समन्वयक श्रीनाथ भिमाले, दीपक मिसाळ, राजेंद्र शिळीमकर, मानसी देशपांडे, रुपाली धाडवे,



वर्षा साठे, कविता वैरागे, राजश्री शिळीमकर, प्रविण चोरबोले, अनुसया चव्हाण, प्रशांत दिवेकर, शिवसेना नेते सुधीर कुरूमकर, नितीन लगस, श्रीकांत पुजारी, अविनाश खेडेकर, राष्ट्रवादीचे संतोष नांगरे, श्वेता होनराव यांची प्रमुख उपस्थिती होती. मोहोळ म्हणाले, ‘ससूनच्या धर्तीवर रुग्णालय उभारू अशी घोषणा काँग्रेसकडून अनेक वर्षे केली गेली. पण ती कधीही प्रत्यक्षात आली नाही. आमदार माधुरी मिसाळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने केंद्र शासन हे रुग्णालय उभारत आहे. नव्या प्रशस्त रुग्णालयात अतिदक्षता विभाग, बाह्यरूग्ण कक्ष, सुपर स्पेशालिटी सुविधांसाठी स्वतंत्र कक्ष, साधारण व अतिदक्षता विभागाचे कक्ष असतील. रेडिओलॉजी, बायोकेमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळांचा समावेश असेल. पुढील दोन वर्षांत बांधकाम पूर्ण होईल.

पुणे महापालिकेचे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय माझ्या महापौर पदाच्या कारकिर्दीत सुरू करता आले याचा विशेष आनंद वाटतो. या महाविद्यालयामुळे वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि रुग्णांना किफायतशीर दरात आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. कोरोना काळात शहराच्या आरोग्य यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि विस्तार करण्यात आला.

### 29 एप्रिल रोजी मोदींची सभा...



दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुणे, शिरूर, बारामती आणि मावळ लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी महाविजय संकल्प सभेचे आयोजन येत्या 29 एप्रिल रोजी वानवडी येथील रेस कोर्स मैदान येथे सायंकाळी 5 वाजून 30 मिनिटांनी करण्यात आले आहे. या सभेला महायुतीचे दोन लाख कार्यकर्ते उपस्थित राहतील अशी माहिती प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष राजेश पांडे यांनी दिली. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, शिवसनेचे शहर प्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, शिवसेना सहसंपर्क प्रमुख संजय भोसले, मनसेचे अध्यक्ष साईनाथ बाबर, आरपीआयचे अध्यक्ष संजय सोनावणे, पुणे लोकसभा प्रभारी श्रीनाथ भिमाले, महायुती समन्वयक संदीप खर्डेकर, राजेंद्र शिळिमकर आदी उपस्थित होते.

---

# शिरूरमधून आढळरावच जिंकणार!

## तब्बेत बरी झाल्यानंतर प्रचार करणार!: दिलीप वळसे पाटील

| पुणे | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

शिरूर लोकसभा मतदार संघात प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू आहे. महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासाठी महायुतीतील सर्व नेते प्रचारात दिसत असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, मंत्री दिलीप वळसे पाटील कुठेही दिसत नाहीत यावरून चर्चा रंगलेल्या पाहायला मिळाल्या. आता एका वृत्त वाहीनिशी बोलताना त्यांनी आढळराव पाटील जिंकतील असा विश्वास व्यक्त केला.





त्यानुसार राज्याच्या मागील महिन्यात झालेल्या अपघातानंतर आजारी असल्याने प्रचारात नव्हतो, मात्र तब्येत बरी झाल्या नंतर आढळराव पाटलांचा प्रचार करणार असल्याचे सांगत आढळराव पाटील शंभर टक्के विजयी होतील असा विश्वास वळसे पाटील यांनी व्यक्त केला.या विषयी बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले, माझी प्रकृती आता एकदम उत्तम आहे. गेल्या 15 दिवसांत त्यामध्ये खूप सुधारणा झाली आहे. अजुन थोडी सुधारणा झाल्याबरोबर मी माझ्या मतदार संघातील जनतेशी संवाद साधणार आहे, त्यांच्या समस्या जाणून घेणार आहे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांचा प्रचार देखील करणार आहे. दरम्यान, आपल्याला असा खासदार निवडून देण्याची गरज आहे जो आपले प्रश्न दिल्लीत मांडेल आणि दिल्लीतून निधी आणून आपल्याला मतदार संघाचा विकास करेल. या निवडणुकीमध्ये प्रामुख्याने विकासाच्या गोष्टी करायला पाहिजे, पण टीका करण्यावर भर दिला जातोय. विद्यमान खासदार गल्ली फिरायचं नाही म्हणतात. पण ते विसरून जातात की, गल्लीतली माणसं तुम्हाला दिल्लीत पाठवत असतात. जुन्नर तालुक्यातील विकास कामे फक्त कागदावर आहेत. मला ते प्रत्यक्षात उतरवायचे आहेत. पर्यटनासाठी जुन्नर तालुका सक्षम पर्याय आहे. पर्यटन म्हणून अनेक प्रकार निधी आपण आपल्या तालुक्यात आणू शकतो, असा विश्वास आढळराव पाटलांनी व्यक्त केला. ते जुन्नर येथे बोलत होते.

### तालुक्याला दादांची गरज...

तसेच, अजित पवार गटातील आमदार अतुल बेनके म्हणाले की, “छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीतून आपण प्रचार दौरा सुरू केला याचा अभिमान आहे. विद्यमान खासदार यांच्या जनतेबद्दल बिलकुल तळमळ नव्हती, जो माणूस निवडून देतो त्याला आपल्याबद्दल तळमळ असली पाहिजे. शाश्वतीने काम करणारा व्यक्ती पाहिजे. ते व्यक्ती आहे शिवाजीराव आढळराव पाटील आता आपल्या तालुक्याला दादांची गरज आहे. धरणातील पाणी नदीला कमी पडू देणार नाही.

# पिंपरी, तळेगाव, चाकणमध्ये 'बत्तीगुल'!

## दीड तास वीज पुरवठा बंद : अतिउच्चदाबाच्या 400 केव्ही उपकेंद्रात बिघाड

। पिंपरी ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या (पीजीसीआयएल) तळेगाव अतिउच्चदाब 400 केव्ही उपकेंद्रात बिघाड झाल्यामुळे शुक्रवारी (दि. 26) पिंपरी, चिंचवड, पिंपळे सौदागर, रहाटणी, वाकड, चाकण, तळेगाव, वडगाव, कामशेत, मरकळ, आकुर्डी या परिसरातील सुमारे 1 लाख 32 हजार 900 ग्राहकांचा वीजपुरवठा दुपारी 1.49 ते 3.30 या कालावधीत खंडित झाला होता.**






याबाबत माहिती अशी की, तळेगाव येथील 'पीजीसीआयएल'च्या अतिउच्चदाब 400 केव्ही उपकेंद्रात आज दुपारी पावणे दोनच्या सुमारास बिघाड झाला. त्यामुळे महापारेषणच्या 220 केव्ही काठापूर,132 केव्ही सणसवाडी, 132 केव्ही मरकळ, 220 केव्ही थेऊर, 132 केव्ही यवत,132 केव्ही रहाटणी, 220 केव्ही उर्से, 220 केव्ही चिंचवड या अतिउच्चदाबाच्या उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला.

परिणामी महावितरणच्या 18 उपकेंद्रांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला. अतिउच्चदाबाच्या आठ उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडल्याने तब्बल 523 मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली. त्यामुळे पारेषण यंत्रणेतील संभाव्य धोके व बिघाड टाळण्यासाठी स्वयंचलित भारव्यवस्थापन यंत्रणा म्हणजेच 'एलटीएस' (LOAD TRIMMING SCHEME) यंत्रणा कार्यान्वित झाली.

त्यामुळे पिंपरी गाव, चिंचवड, पुनावळे, वाल्हेकरवाडी, रहाटणी, पिंपळे सौदागर, वाकड, ताथवडे, किवळे, रावेत, थेरगाव, सांगवी, आकुर्डी परिसर तसेच चाकण, कुरळी, नाणेकरवाडी, निघोजे, शेल पिंपळगाव, धावडी, तळेगाव, वडगाव, कामशेत शहर व परिसरातील सुमारे 1लाख 32 हजार 900 ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

### दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर...

'पीजीसीआयएल'च्या अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर तांत्रिक उपाययोजना करून दीड तासांत पर्यायी स्वरुपात वीजपुरवठा उपलब्ध करून दिला व महापारेषणच्या अतिउच्चदाबाच्या व त्यानंतर महावितरणच्या उपकेंद्रांचा खंडित झालेला वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत झाला. 'पीजीसीआयएल'च्या तळेगाव 400 केव्ही उपकेंद्रातील बिघाड दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु असून महापारेषण कंपनीचे पुणे येथील एक पथक याकामी सहकार्य करीत आहे. रात्री उशिरापर्यंत उपकेंद्रातील दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले.

---

# शिरुरमध्ये भोसरी महायुतीसाठी 'किंगमेकर'!

## महेश लांडगे : शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या पदयात्रेला प्रतिसाद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघात महायुतीची ताकद निर्णायक असून, गत निवडणुकीत या मतदार संघातून सुमारे ३७ हजार मतांचे लीड आढळराव पाटलांना मिळाले होते. आता त्याची पुनरावृत्ती होणार असून, यावेळी १ लाख मातांची आघाडी या मतदार संघातून राहील आणि शिरुर लोकसभा मतदार संघात भोसरी 'किंगमेकर'च्या भूमिकेत असेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**



शिरुर लोकसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय- मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ भोसरी गावठाण येथे दौरा करण्यात आला. यावेळी पदयात्रेची सुरूवात भोसरीचे ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरात दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर श्री हनुमान मंदिर येथे भेट दिली. पदाधिकाऱ्यांनी वाजत गाजत फटाक्याच्या आतिषबाजीत आढळराव पाटील यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, भोसरी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. परिसरात पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार महेश लांडगे यांच्यासह महायुती व घटक पक्षांचे मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील महिला-माता-भगिनींनी उमेदवार आढळराव पाटील यांचे ठिकठिकाणी औक्षण केले. भोसरी विधानसभा मतदार संघातून १ लाख मतांची आघाडी देण्याचा निर्धार श्री. भैरवनाथ मंदिरात करण्यात आला.

तसेच, "बलशाली भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांना साथ द्या..." असे आवाहन यानिमित्ताने मतदार, नागरिकांना करण्यात आले.

> देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात झालेला विकास, शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय, कल्याणकारी योजना आणि देशाची जागतिक पातळीवर उंचावलेली प्रतिक्षा यामुळे महायुतीला निश्चितपणे मोठा जनाधार आहे. भोसरी मतदार संघातील सुमारे ५ लाख ३५ हजाराहून अधिक असलेले मतदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून देतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.



### 'माजी आमदार विलास लांडे प्रचारात

भोसरी दौऱ्यादरम्यान लांडेवाडी रोड येथे माजी आमदार विलास लांडे यांच्या निवासस्थानी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी भेट दिली. लांडे परिवारकडून त्यांचे स्वागत करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, पुणे नियोजन समिती विजय फुगे, भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, माजी नगरसेवक विक्रांत लांडे आदी उपस्थित होते. विलास लांडे लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक होते. त्यांनी उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे त्यांची नाराजी होती, अशी चर्चा होती. मात्र, लांडे आणि आढळराव पाटील यांच्यात मनोमिलन झाले असून, लांडे प्रचारात सक्रीय होतील, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# बुद्धिमत्तेच्या भविष्यात डोकावताना...




**हेन्री फोर्डच्या आधीही कार्स होत्या आणि हॉटमेलच्या आधीही ईमेल-सेवादाते होतेच. परंतु, फोर्ड मॉडेल 'टी' कारच्या 'मूव्हिंग असेंब्ली लाईन' आणि हॉटमेलच्या 'मोफत सेवा' या नव्या टप्प्यांमुळे कार आणि ईमेल हे तंत्रज्ञान सामान्यांच्या आवाक्यात आले. त्या तंत्रज्ञानाभोवतीचे वलय विरले.**

काहीसे असेच चित्र, सर्जनशील कृत्रिमप्रज्ञा म्हणजेच जनरेटिव्ह एआयच्या टप्प्यामुळे कृत्रिमप्रज्ञा तंत्रज्ञानाबाबत निर्माण झाल्याचे दिसते. संगणकीय कृत्रिमप्रज्ञा या तंत्रज्ञानाची सुरुवात तशी ८०-९० वर्षांपूर्वी झाली. संगणकांच्या निर्मितीनंतर काही दशकांतच त्याची सैद्धांतिक मांडणी करण्यात आली. परंतु, दैनंदिन आयुष्यात कृत्रिमप्रज्ञेची फारशी चर्चा नव्हती. कृत्रिमप्रज्ञेविषयी अकॅडमिक तत्त्वचर्चा आणि विज्ञानकथांची निर्मिती घडत होती, परंतु कृत्रिमप्रज्ञेच्या विकासासाठी केवळ संरक्षणखातीच लक्षणीय गुंतवणूक करीत होती. आता मात्र, प्रचंड क्षमतेची आकडेमोड करू शकणाऱ्या नव्या संगणकांमुळे आणि सर्जनशील कृत्रिमप्रज्ञा-सेवादात्यांतील स्पर्धेमुळे सर्जनशील कृत्रिमप्रज्ञा तंत्रज्ञान वेगाने विकसित झाले आहे. सामान्य व्यक्तींनासुद्धा ते दैनंदिन उपयोगासाठी, स्वस्तात किंवा मोफत वापरता येऊ लागले आहे. बहुतेक सर्व संकेतस्थळांवर तक्रारनिवारणाच्या पहिल्या पायरीत सर्जनशील कृत्रिमप्रज्ञेचा चॅट-बॉटच ग्राहकांशी संवाद साधतो. अनेक हौशा, नवशा आणि गवशा




कंपन्यांनी या क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या घोषणा केल्या आहेत. काही चहा किंवा भेळविक्रेत्यांनीही आपल्या ठेल्यांची नावे 'चाय जीपीटी' किंवा 'चाट जीपीटी' अशी ठेवली आहेत, एवढे हे तंत्रज्ञान सर्व स्तरांपर्यंत पोहोचले आहे. गेल्यावर्षी अमेरिकेतील अभिनेते आणि पटकथालेखकांनी संप केला होता. चित्रपट उद्योगातील तो सर्वाधिक काळ चाललेला संप ठरला. त्यांना अशी भीती होती की कृत्रिमप्रज्ञा तंत्रज्ञानामुळे त्यांच्या रोजगारांवर गदा येईल. सध्या अनेक रेडिऑलॉजिस्ट डॉक्टर एकमेकांची समजूत काढू लागले आहेत की कृत्रिमप्रज्ञा तंत्रज्ञानाने सरसकट सर्व रेडिऑलॉजिस्ट डॉक्टरांच्या नोकऱ्या गेल्या, असे काही घडणार नाही, परंतु कृत्रिमप्रज्ञा तंत्रज्ञान वापरणाऱ्या रेडिऑलॉजिस्ट डॉक्टरांमुळे, हे तंत्रज्ञान न वापरणारे रेडिऑलॉजिस्ट डॉक्टर अडगळीत पडतील. कोट्यवधी व्यावसायिक वाहनचालकांचे रोजगार पूर्णपणे स्वयंचलित वाहनांमुळे धोक्यात येऊ शकतील. कॉपीरायटिंग आणि कोडिंग करणाऱ्यांच्याही नोकऱ्या सर्जनशील कृत्रिमप्रज्ञेमुळे घटत आहेत. फेक न्यूज, ब्लॅकमेल किंवा निवडणुकांत हस्तक्षेप करण्यासाठीही सर्जनशील कृत्रिमप्रज्ञेचा वापर सुरू झाला आहे. सर्जनशील कृत्रिमप्रज्ञेविषयी सध्या जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या असलेल्या वातावरणाची तुलना, १९३६ सालच्या मॉडर्न टाईम्स या चार्ली चॅप्लिनच्या चित्रपटातील, मुव्हिंग असेंब्ली लाईनविषयीच्या कलुषित दृष्टिकोनाशी (VILIFICATION) करता येईल.समाजावर दूरगामी परिणाम घडवण्याची क्षमता असलेल्या या विषयाची दखल घेऊन मराठी भाषकांचे शंकानिरसन करण्यासाठी, बृहन्महाराष्ट्र मंडळाने आपल्या द्वैवार्षिक संमेलनात एक परिसंवाद आयोजित केला आहे. कृत्रिमप्रज्ञेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या मराठी शास्त्रज्ञांचा हा परिसंवाद अमेरिकेतील सॅन होजे येथे २८ जून रोजी होणार आहे.. सर्जनशील कृत्रिमप्रज्ञा तंत्राची तोंडओळख देऊन, तिच्या निर्मिती आणि प्रशिक्षणातील धोके हे शास्त्रज्ञ सोप्या भाषेत समजावून सांगतील आणि कृत्रिमप्रज्ञा तंत्राची व्याप्ती आणि मर्यादा, नजीकच्या भविष्यात तिच्यामुळे उद्भवू शकणाऱ्या औद्योगिक, आर्थिक, नैतिक, आणि सामाजिक समस्या आणि या समस्यांवरील उपाययोजना यांविषयी भाष्य करतील. ही कदाचित कृत्रिम प्रज्ञेचे तंत्रज्ञान, त्याचे फायदे आणि त्यात दडलेले धोके मराठीतून सोप्या पद्धतीने समजून घेण्याची सुरुवात ठरू शकते. कृत्रिमप्रज्ञा स्वत:ही चुकू शकते हे स्पष्ट झाले आहे. मानव जसा स्वतःही चुकू शकतो, त्याच्या मनात जसे पूर्वग्रह असू शकतात, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही होऊ शकते, हे वापरकर्त्यांनी समजून घेणे गरजेचे आहे. या चुका कशा टाळाव्या याचे मार्गदर्शनही मिळविणे आवश्यक आहे. यंत्रवत, प्रवाहपतित आणि अंधश्रद्ध मनोवृत्ती टाकून सजग, सावध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचा पुरस्कार या परिसंवादात कृत्रिमप्रज्ञेच्या अनुषंगाने करण्यात येईल. संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या सिलिकॉन व्हॅलीत या संदर्भात मराठीत चर्चा घडणे.

## संपादकीय »

# द्वेषाचे सुरेल दूत!

***मिरवणूक सुरू होती. तिचं रूपांतर झुंडीत कसं झालं? रामनवमीची मिरवणूक दरवर्षीच मशिदीसमोरून जाते. मग नेमकं त्याच वर्षी पोलिसांना का मध्ये पडावं लागलं?***

पत्रकाराला बातमी कधी, कुठे दिसेल, किती प्रश्न निर्माण करेल, किती काळ झपाटून सोडेल सांगता येत नाही.. पत्रकार कुणाल पुरोहित झारखंडमधल्या गुमला नावाच्या लहानशा गावात कामानिमित्त गेले होते. चहाच्या टपरीवर गावकऱ्यांशी गप्पा मारताना तिथे झालेल्या मॉब लिंचिंगचा विषय निघाला. त्यातून कळलं की देशभर चर्चा झालेल्या त्या घटनेला निमित्त ठरलं होतं डीजेच्या दणदणाटात वाजवलेलं एक गाणं. आता त्या घटनेला दोन वर्ष लोटली होती; पण शिळी बातमी म्हणून सोडून न देता त्यांनी पुढे चार वर्ष पाठपुरावा केला. गाणं एखाद्याचं आयुष्य संपवू शकतं का, या प्रश्नाचं उत्तर शोधत हिंदी भाषक पट्ट्यातली गावखेडी पालथी घातली. या प्रवासात एक एकारलेलं जग उलगडत गेलं. 'एच- पॉप : द सीक्रेटिव्ह वर्ल्ड ऑफ हिंदुत्व पॉप स्टार्स' हा या चार वर्षांच्या अभ्यासाचा दस्तावेज आहे.

सघन लोकसंख्येने व्यापून राहिलेल्या महानगरांमध्ये स्मृतींचीही घनदाट वस्ती असते. अतीत हे शहरांमध्ये जगतही असतं आणि नाहीसंही होत असतं. एका शहरात एकाच वेळी अनेक शहरं जगत असतात. काही तिथंच जमिनीलगत रुजलेली असतात.

# मुंबईच्या रंगविश्वाची बखर

तिथल्या माती-पाणी आणि हवेवर तगलेली, तर काही जमिनीपासून उंच तरंगणारी. त्यांचा तिथल्या माती-पाण्याशी फारसा सेंद्रिय संबंध नसतो. ती तरंगती शहरं असतात. त्यातल्या नागरिकांसाठी जगभरात कुठेही अगदी तस्संच जगणं उपलब्ध असतं. सतराव्या शतकाच्या मध्यानंतर हळूहळू वाढत-विस्तारत गेलेलं मुंबई हे असं एक महानगर आहे की त्याच्यासोबत साडेतीनशेहून जास्त वर्षांच्या स्मृतींचं समृद्ध संचित साठलेलं आहे. शहराचा अवकाश हेच अखेरीला सामाजिक-राजकीय- आर्थिक- सांस्कृतिक इतिहासाच्या सगळ्या घटितांचं मैदान असतं. अशा इतिहासाला आपापल्या पद्धतीनं नोंदवत ठेवणारे, त्याचं मोल जाणणारे बखरकार असतात आणि त्यांच्यामुळेच आपल्याला काळाच्या सातत्याचं सम्यक भान प्राप्त होतं. मुंबईच्या बाबतीत असे लोक सहजपणे आपल्याला आठवतात, त्यात 'मुंबईचे वर्णन' लिहिणारे माडगावकर, न. र. फाटक, महिकावतीची बखर संपादित



करणारे वि. का. राजवाडे, 'स्थलकाल' लिहिणारे अरूण टिकेकर, गिरणगावची कथा लिहिणाऱ्या नीरा आडारकर, बा. वा. गोखले आणि अशी अनेक नावं समोर येतात. नरेश फर्नांडिस यांची बॉम्बे अड्रिफ्ट, बॉम्बे मेरी जान, (जेरी पिंटो यांच्यासोबत), ताजमहाल : फॉक्सट्रॉट ही नावंही आहेत आणि जिम मेसेलॉ याच्यासारखे परदेशी समाजशास्त्रज्ञही या महानगराच्या इतिहास-वर्तमानाचा चिकित्सक आढावा घेताना दिसतात.

मुंबई शहराचा सांस्कृतिक इतिहास सांगताना त्या शहराचं मिथक, जादू, कोडं उलगडण्याचा उत्तम प्रयत्न अलीकडे प्रकाशित झालेल्या 'शहर जो खो गया' या हिंदी कवी आणि लेखक विजय कुमार यांच्या पुस्तकातही दिसतो. लिहित्या संवेदनशील लेखकांना शहरांचं चेटूक आणि मायालाघव आकर्षित करून घेत असतं. म्हणूनच कवाफीला 'इथाका' ही कविता लिहावीशी वाटते आणि ओरहान पामुक 'इस्तन्बूल : मेमरीज ऑफ अ सिटी' लिहितो. जोसेफ ब्रॉड्स्की 'वॉटरमार्क' आणि झेडी स्मिथ लंडनवरचं 'एनडब्ल्यू' लिहिते. 'मुंबई मर्मिरग्ज : २१३ टायनी टेल्स' हे रामू रामनाथन यांचं पुस्तक मुंबई महानगरातल्या वेगळ्या जगाचं दर्शन घडवतं. रामू हे लेखक, नाटककार, दिग्दर्शक, समीक्षक, पत्रकार, भाषांतरकर्ते असे बहुमुखी लेखक आहेत. नाटक हा त्यांच्या जिव्हाळ्याचा भाग आहे. त्यामुळे या पुस्तकात नाटक या सूत्राभोवती गोवलेले किस्से आहेत. या किश्शांचं स्वरूप पान-अर्ध पान.. फार तर दोन पानं इतकंच आहे, पण या बारक्या कानगोष्टींतून विविध विषयांच्या किरकोळ तपशिलांसह त्या त्या विषयाचं मर्म सांगितलेलं आहे. शिवाय प्रत्येक किश्शाला शेवटी 'ग्रीन रूम गपशप' म्हणून तळटीपेतल्या गप्पा जोडलेल्या आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यातील कांदा निर्यातीला परवानगी!

## कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन पांढरा कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर मात्र विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. जेष्ठ नेते शरद पवार आणि खासदार संजय राऊत यांनीही केंद्रावर निशाणा साधला होता. यानंतर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी करण्यात येत होती.**



यानंतर अखेर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. महाराष्ट्र राज्य हे कांदा निर्यातीसाठी मोठा पुरवठादार राज्य मानले जाते . मात्र, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत होता. कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्यांना योग्य दर मिळत नव्हते. अशातच केंद्र सरकारने गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यात करण्याला परवानगी दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील काद्यांचे काय? असा सवाल विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केले. याचबरोबर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारवर नाराजी व्यक्त केली. यानंतर केंद्र सरकारने अखेर महाराष्ट्रातील कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. आता श्रीलंका, भुतान, बांगलादेश, बहरैन, युएई, मॉरिशस या देशांमध्ये कांदा निर्यात करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. आता जवळपास ९९ हजार १५० मेट्रीक टन कांद्यांची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन सफेद कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले होते, “दोन हजार मेट्रिक टन गुजरातचा कांदा मुंबईच्याच न्हावा-शिवा पोर्टस् वरून परदेशात जाणार आहे. ऐन निवडणुकीत गुजरातच्या व्यापाऱ्यांना आणि ठेकेदारांना मालामाल करण्याचा हा डाव आहे. महाराष्ट्राचा कांदा हा सडत आहे, त्याला भाव नाही. येथे तुम्ही निर्यातबंदी केली. पण गुजरातचा पांढरा कांदा हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय आहे”, अशी टीका संजय राऊत यांनी केली होती.यानंतर अखेर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. महाराष्ट्र राज्य हे कांदा निर्यातीसाठी मोठा पुरवठादार राज्य मानले जाते . मात्र, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत होता. कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्यांना योग्य दर मिळत नव्हते. अशातच केंद्र सरकारने गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यात करण्याला परवानगी दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील काद्यांचे काय? असा सवाल विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केले.

### महाराष्ट्राचा कांदा हा सडत आहे

» याचबरोबर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारवर नाराजी व्यक्त केली. यानंतर केंद्र सरकारने अखेर महाराष्ट्रातील कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. आता श्रीलंका, भुतान, बांगलादेश, बहरैन, युएई, मॉरिशस या देशांमध्ये कांदा निर्यात करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. आता जवळपास ९९ हजार १५० मेट्रीक टन कांद्यांची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन सफेद कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले होते, “दोन हजार मेट्रिक टन गुजरातचा कांदा मुंबईच्याच न्हावा-शिवा पोर्टस् वरून परदेशात जाणार आहे. ऐन निवडणुकीत गुजरातच्या व्यापाऱ्यांना आणि ठेकेदारांना मालामाल करण्याचा हा डाव आहे. महाराष्ट्राचा कांदा हा सडत आहे, त्याला भाव नाही. येथे तुम्ही निर्यातबंदी केली. पण गुजरातचा पांढरा कांदा हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय आहे”, अशी टीका संजय राऊत यांनी केली होती.

---

# महाराष्ट्रात अवकाळी पावसाचं थैमान!

## बीडमध्ये 500 कोंबड्यांचा मृत्यू; मराठवाड्याला झोडपलं

। अलिबाग । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट कायम आहे. राज्यात गेल्या आठवड्याभरात विविध जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. विदर्भासह मराठवाड्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पाहायला मिळत आहे.**



बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचं संकट ओढवलं आहे. आष्टी तालुक्याला सर्वाधिक फटका बसला असून 500 कोंबड्या मरण पावल्या आहेत. अनेक घरांचे छप्पर उडून गेलं आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.बीड जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. परिणामी शेतकऱ्यांना या पावसाचा सामना करावा लागतोय. आधीच अडचणीत असणारे शेतकरी आता अवकाळीच्या संकटाला सामोरे जात आहेत. आष्टी तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने फळबागेसह पशुधन मृत्युमुखी पडले आहेत. सांगवी पाटण या ठिकाणी शेख दगडू यांच्या पोल्ट्री फार्ममधील 500 कोंबड्या मरण पावल्या आहेत. प्रशासनाने या नुकसानग्रस्त परिस्थितीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जाते.बीडमधील धारूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे केळी आणि आंब्याच्या फळबागाचं प्रचंड नुकसान झालं असून व्यथा मांडताना शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले आहेत. रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे धारूर तालुक्यातील कांदेवाडी येथे मोठ्या प्रमाणात केळी आणि आंब्याच्या फळबागांचं प्रचंड नुकसान झालं आहे.

### अवकाळीनं शेतातील पीक भुईसपाट

» तर बारा एकरावर लावलेल्या केळीच्या बागा वादळी वारा आणि पावसामुळे जमिनदोस्त झाल्या आहेत. रात्रीच्या वेळी अचानक धारूर तालुक्यामध्ये अवकाळी पावसाला सुरुवात झाली, त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांनी बँकेचे आणि खाजगी सावकाराचं कर्ज काढून या बागा जोपासल्या होत्या आणि आता ऐन फळ तोडणीच्या काळामध्ये अवकाळी पावसानं शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. त्यामुळे बँकेचे कर्ज फेडायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.मागील दोन दिवसांपासून भंडारा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं अक्षरशः थैमान घातलं. मध्यरात्रीच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकळी पावसानं जोरदार हजेरी लावली. यामुळं शेतातील उभा मका, भातपीक अक्षरशः जमीनदोस्त झाले आहेत. तर, आंब्याचं मोठं नुकसान झालं आहे. यासोबतच बागायती पिकांचाही नुकसान झालं.

# मोदी विश्वनेते, कुणीही नाद करायचा नाही

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांना इशारा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महायुतीचे कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. “धनुष्यबाण आला आणि पंजा कायमचा गेला. येथील जनता ७ मे रोजी धनुष्यबाणाच्या खटक्यावर बोट ठेवेल आणि विरोधकांचा टांगा पलटी घोडे फरार करेल”, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी महाविकास आघाडीवर केला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले विश्वनेते आहेत. नरेंद्र मोदी यांचा कुणीही नाद करायचा नाही. आपलं ठरलं आहे, मत मोदींना आणि मत धनुष्यबाणाला. पंतप्रधान मोदी यांना मत म्हणजे देशाच्या निकासाला मत. विकासाबरोबर ते देशाचा वारसाही जपत आहेत. त्यामुळे आपण कायम म्हणतो, मोदी है तो सब मुमकिन है. या देशात गॅरंटी कुणाची चालते? बाकीच्या गॅरंटी फेल झाल्या आहेत. फक्त एकच गॅरंटी चालते, ती म्हणजे मोदींची गॅरंटी. या देशाला जगामध्ये सन्मान मिळून देण्याची गॅरंटी. शेतकऱ्यांना सक्षम करण्याची गॅरंटी. या गॅरंटीच्या आडवे येणाऱ्यांचा काट किर्रर झाल्याशिवाय राहणार नाही”, असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केला.

“काँग्रेसचं काय चाललंय? येड्याची जत्रा आणि पेढ्यांचा पाऊस. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे फक्त आश्वासनांचे पेढे नाही तर त्यांच्याकडे गॅरंटी आहे.आपण फक्त मत माघत नाही तर काम करतो. पूर आला तेव्हा कोल्हापूरकरांचं दर्शन घडलं.त्यावेळी पहिल्या आणि दुसऱ्या माळावर पाणी शिरलं होतं.तेव्हा लोक वरती माळावर गेले होते. त्यावेळी लोक आपल्या गायी-म्हशींनाही बरोबर घेऊन गेले होते. तेव्हा त्यांना विचारलं तर ते म्हणाले हे आमचं कुटुंब आहे, म्हणून एकीकडे गो-धनाला बरोबर ठेवणारे कुठे आणि २६ जुलैच्या पुरावेळी बाळासाहेबांना मातोश्रीमध्ये एकटे सोडून फाईव्ह स्टारमध्ये जाणारे कुठे?”, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते, शिवसेनेची कधीही काँग्रेस होऊ देणार नाही. अशी वेळ आली तर मी माझे दुकान बंद करेन. पण आज त्यांचा मुलगा आणि परिवार काँग्रेसला मतदान करणार आहे. जनाची नाही तर मनाची तरी ठेवली पाहिजे. ज्या गोष्टींचा खेद वाटायला हवा, त्या गोष्टींचा त्यांना अभिमान वाटत आहे. आता उबाठाची शंभर टक्के काँग्रेस झाली आहे”, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले विश्वनेते आहेत. नरेंद्र मोदी यांचा कुणीही नाद करायचा नाही. आपलं ठरलं आहे, मत मोदींना आणि मत धनुष्यबाणाला. पंतप्रधान मोदी यांना मत म्हणजे देशाच्या निकासाला मत. विकासाबरोबर ते देशाचा वारसाही जपत आहेत. त्यामुळे आपण कायम म्हणतो, मोदी है तो सब मुमकिन है.

### 89 जागांवर मतदान होणार होते

» त्यावेळी लोक आपल्या गायी-म्हशींनाही बरोबर घेऊन गेले होते. तेव्हा त्यांना विचारलं तर ते म्हणाले हे आमचं कुटुंब आहे, म्हणून एकीकडे गो-धनाला बरोबर ठेवणारे कुठे आणि २६ जुलैच्या पुरावेळी बाळासाहेबांना मातोश्रीमध्ये एकटे सोडून फाईव्ह स्टारमध्ये जाणारे कुठे?”, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते, शिवसेनेची कधीही काँग्रेस होऊ देणार नाही. अशी वेळ आली तर मी माझे दुकान बंद करेन. पण आज त्यांचा मुलगा आणि परिवार काँग्रेसला मतदान करणार आहे. जनाची नाही तर मनाची तरी ठेवली पाहिजे. ज्या गोष्टींचा खेद वाटायला हवा, त्या गोष्टींचा त्यांना अभिमान वाटत आहे. आता उबाठाची शंभर टक्के काँग्रेस झाली आहे”, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर केली.“काँग्रेसचं काय चाललंय? येड्याची जत्रा आणि पेढ्यांचा पाऊस. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे फक्त आश्वासनांचे पेढे नाही तर त्यांच्याकडे गॅरंटी आहे.आपण फक्त मत माघत नाही तर काम करतो. पूर आला तेव्हा कोल्हापूरकरांचं दर्शन घडलं. त्यावेळी पहिल्या आणि दुसऱ्या माळावर पाणी शिरलं होतं.

या देशात गॅरंटी कुणाची चालते? बाकीच्या गॅरंटी फेल झाल्या आहेत. फक्त एकच गॅरंटी चालते, ती म्हणजे मोदींची गॅरंटी. या देशाला जगामध्ये सन्मान मिळून देण्याची गॅरंटी. शेतकऱ्यांना सक्षम करण्याची गॅरंटी. या गॅरंटीच्या आडवे येणाऱ्यांचा काट किर्रर झाल्याशिवाय राहणार नाही”, असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केला.

“काँग्रेसचं काय चाललंय? येड्याची जत्रा आणि पेढ्यांचा पाऊस. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे फक्त आश्वासनांचे पेढे नाही तर त्यांच्याकडे गॅरंटी आहे.आपण फक्त मत माघत नाही तर काम करतो. पूर आला तेव्हा कोल्हापूरकरांचं दर्शन घडलं. त्यावेळी पहिल्या आणि दुसऱ्या माळावर पाणी शिरलं होतं. तेव्हा लोक वरती माळावर गेले होते.

# महायुतीतील ‘त्या’ 7 जागांचा तिढा सुटला?

## तापमानासोबत निवडणुकीचं राजकीय तापमानही वाढत चाललंय

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पार पडले आहेत. राज्यातील तापमानासोबत निवडणुकीचं राजकीय तापमानही तापत चाललंय. लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीमधील इतक्या दिवसांपासून सुरु असेलला सात जागांचा तिढा अखेर सुटल्याच बोलं जातंय. महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून एकमेकांच्या जागावर दावा करण्यात येतोय. उमेदवार घोषित करण्यात येईल असं सूत्रांनी सांगितलंय.**



महायुतीत ठाणे, पालघर, नाशिक कोणाकडे जाणार हे ठरत नसल्याने हा तिढा वाढत होता. मुंबईतील सहा जागापैकी चार जागा शिवसेना ठाकरे गटाला मिळाल्या आहेत. या जागेवर शिवसेने उमेदवार जाहीर केलाय. दरम्यान काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या मुंबई उत्तर मध्य, मुंबई उत्तर या दोन जागेवरील उमेदवार अद्याप जाहीर केलेले नाहीत. ठाणे, नाशिक, पालघर, कल्याण, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण या जागांवर उमेदवारीचा पेच आहे. महायुतीच्या याच हायव्होल्टेज मतदारसंघाचा निर्णय आज किंवा उद्या होण्याची शक्यता आहे. ठाणे आणि नाशिक मतदारसंघांवर शिवसेनेचा दावा कायम आहे तर पालघर आणि दक्षिण मुंबईवर भाजपनं दावा केलाय. नाशिक लोकसभा

### सात जागांचा तिढा अखेर सुटल्याच


» गोडसेंना तिकीट मिळत नसल्यास किमान सुनेला तिकीट द्यावे अशी आग्रही मागणी करण्यात आल्याची चर्चा आहे. तर दुसऱ्या बाजूला छगन भुजबळ हे मुंबईमध्ये आहेत. तिथे मविआ उमेदवार राजाभाऊ वाजे आणि शांतीगिरी महाराजांनी प्रचार सुरु केलाय. लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पार पडले आहेत. राज्यातील तापमानासोबत निवडणुकीचं राजकीय तापमानही तापत चाललंय. लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीमधील इतक्या दिवसांपासून सुरु असेलला सात जागांचा तिढा अखेर सुटल्याच बोलं जातंय. महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून एकमेकांच्या जागावर दावा करण्यात येतोय. उमेदवार घोषित करण्यात येईल असं सूत्रांनी सांगितलंय. महायुतीत ठाणे, पालघर, नाशिक कोणाकडे जाणार हे ठरत नसल्याने हा तिढा वाढत होता.

मतदारसंघांमध्ये उमेदवार जाहीर होत असल्याने महायुतीचे इच्छुक सैरभैर झालेत. विद्यमान खासदार आणि सध्याचे गोडसेंनी शुक्रवारी तुळजापुरात दर्शन घेतलं तर त्यांचा मुलगा आणि सुनेनं मुख्यमंत्र्यांची भेट घेत गोडसेंना तिकिट देण्याचा आग्रह धरला.

# नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला

कुणाल खेमू दिग्दर्शित 'मडगांव एक्सप्रेस' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे. 'मडगांव एक्सप्रेस' या चित्रपटाच्या निमित्ताने दिव्येंदू, अविनाश आणि नोरा नुकतेच 'मॅशबल इंडियन' या युट्यूब चॅनलच्या 'द बॉम्ब जर्नी' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, "जेव्हा मी भारतात पहिल्यांदा आली तेव्हा माझ्या जवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहित नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमा पेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता."पुढे नोरा म्हणाली, "संघर्षाच्या काळात





माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबई सारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे."याआधी नोरा तिच्या संघर्षाविषयी अनेकदा बोलली होती. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, "संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे."दरम्यान, नोरा ही ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती 'स्त्री', 'बाटला हाउस', 'बाहुबली द बिगनिंग', 'क्रॅक' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल



सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हँगर", "ती हँगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.

## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा. विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

## तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ



बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते.

# राजस्थानचा लखनऊ सुपरजायंट्सवर ‘रॉयल’ विजय

## जुरेलच्या भागीदारीच्या जोरावर राजस्थानने विजय मिळवला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेलच्या वादळी १२१ धावांच्या भागीदारीच्या जोरावर राजस्थानने लखनऊ संघावर दणदणीत विजय मिळवला आहे. राजस्थानने लखनऊने दिलेल्या १९७ धावांचा पाठलाग करत ७ विकेट्स आणि १ षटक राखून विजय मिळवला. या विजयासह पहिल्या क्रमांकावर असलेल्या राजस्थानचा संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखली आहे आणि संघाने आपले स्थान कायम ठेवले आहे. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपरजायंट्सने पाच विकेट गमावून १९६ धावा केल्या. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने एका षटकात केवळ तीन विकेट्स गमावून सामना सहज जिंकला. राजस्थानचा हंगामातील नऊ सामन्यांमधील हा आठवा विजय आहे. तर लखनऊला नऊ सामन्यांतील चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले.**



राजस्थानची सुरूवात चांगली झाली असली तरी यशस्वी जैस्वाल आणि जॉस बटलर मोठी खेळी करू शकले नाहीत. यशस्वीने २४ धावा तर बटलर ३४ धावा करत बाद झाला. तर रियान परागही १४ धावा करत बाद झाला. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात ६० धावांवर संघाने पहिली विकेट गमावली. १८ चेंडूत ३४ धावा करून खेळत असलेल्या बटलरला यश ठाकूरने क्लीन बोल्ड केले. तिसऱ्या क्रमांकावर आलेला कर्णधार संजू सॅमसन शेवटपर्यंत क्रीजवर राहिला. दरम्यान, यशस्वी आणि रियान पराग यांच्या विकेट पडल्या, पण पाचव्या क्रमांकावर आलेल्या ध्रुव जुरेलने आपल्या घरच्या मैदानावर मोसमातील पहिले अर्धशतक ठोकले. या अर्धशतकाचे सेलिब्रेशन करताना त्याने पुन्हा एकदा सॅल्युट केले.संजू सॅमसनच्या नेतृत्वातील राजस्थान रॉयल्सनं यंदाच्या हंगामात आठव्या विजयाची नोंद केली आहे. 16 गुणांमुळे राजस्थानचं प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित झालं आहे. यंदाच्या हंगामात प्लेऑफमध्ये पात्र होणारा राजस्थान पहिला संघ ठरला आहे. राजस्थान रॉयल्सनं नऊ सामन्यात आठ विजय मिळवले आहेत. राजस्थानचा फक्त एका सामन्यात पराभव झाला आहे. राजस्थानच्या नावावर 9 सामन्यात 16 गुण झाले आहेत. राजस्ताननं लखनौचा 20 धावांनी पराभव करत यंदाच्या हंगामाची दणक्यात सुरुवात केली. राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना चार विकेटच्या मोबदल्यात 193 धावा केल्या. प्रत्युत्तरदाखल लखनौला 173 धावांत रोखलं.राजस्थाननं दिल्ली कॅपिटल्सचा 12 धावांनी पराभव केला. अटीतटीच्या सामन्यात राजस्थानने बाजी मारली. राजस्थानने प्रथम फलंदाजी कराताना 185 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरदाखल दिल्लीला 173 धावात रोखलं. मुंबईचा पराभव करत राजस्थान रॉयल्सनं सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली. मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना 125 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरदाखल राजस्थानने सहा विकेट राखून हे आव्हान पार केले. मुंबईचा पराभव करत राजस्थान रॉयल्सनं सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली. मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना 125 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरदाखल राजस्थानने सहा विकेट राखून हे आव्हान पार केले. गुजरात टायटन्सनं राजस्थान रॉयल्सचा विजयरथ रोखला. राजस्थानचा पराभव फक्त गुजरातनं केला. अटीतटीच्या सामन्यात गुजरातनं तीन विकेटने विजय मिळवला. राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना 196 धावा केल्या. गुजरातने हे आव्हान तीन विकेट राखून पार केले. राजस्थाननं पंजाब किंग्सचा तीन विकेटने पराभव केला. पंजाबने प्रथम फलंदाजी करताना 147 धावा केल्या.

### राजस्थानचा हल्लाबोल!

» प्रत्युत्तरदाखल राजस्थानने हे आव्हान सात विकेटच्या मोबदल्यात पार केले. गुजरातनं कोलकात्याला घरात जाऊन हरवलं. घरच्या मैदानावर कोलकात्यानं 223 धावांचा डोंगर उभारला होता. राजस्थाननं हे आव्हान शेवटच्या चेंडूवर पार केले. आयपीएलमधील हा सर्वात यशस्वी पाठलागापैकी एक होय. राजस्थान रॉयल्सनं मुंबई इंडियन्सचा 9 विकेटनं सहज पराभव केला. राजस्थान रॉयल्सनं मुंबईने दिलेल्या 180 धावांच्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला. राजस्थान रॉयल्सनं धावांचा पाठलाग करताना यंदाच्या हंगामात शानदार कामगिरी केली. राजस्थाननं पहिल्या दोन सामन्यात फक्त प्रथम फलंदाजी करताना विजय मिळवला. तर गुजरातनं राजस्थानविरोधात धावांचा यशस्वी पाठलाग केला.

# इशान किशनवर दंडात्मक कारवाई!

## दिल्ली कॅपिटल्सच्या सामन्यानंतर इशानला मोठा धक्का

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्स संघाला दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध १० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले आहे. या पराभवासह मुंबईच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा अधिक धुसर झाल्या आहेत. पण मुंबईने त्यांच्या उर्वरित सर्व सामन्यांमध्ये विजय मिळवला तर त्यांना प्लेऑफमध्ये जाण्याची संधी मिळू शकते. दिल्ली विरूद्धच्या या सामन्यानंतर संघाचा विकेटकीपर फलंदाज इशान किशनला मोठा धक्का बसला आहे. इशानवर कारवाई करण्यात आली आहे.**



दिल्लीविरूद्धच्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी इशानवर कारवाई केली आहे. यासोबतच त्याला मॅच फीच्या १० टक्के दंडही ठोठावण्यात आला आहे. इशानने देखील आपली चूक मान्य केली आहे.आयपीएलच्या निवेदनानुसार, “किशनने आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा केला आहे. त्याने गुन्हा कबूल केला आहे आणि पंचांनी ठोठावलेला दंडही मान्य केला आहे. लेव्हल १ च्या आचारसंहितेच्या उल्लंघनासाठी, मॅच रेफरीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक आहे.”कलम २.२ हे ‘क्रिकेट उपकरणे किंवा मैदानातील साहित्याचा’चा गैरवापर केल्याप्रकरणी आहे. या गुन्ह्यात निष्काळजीपणे विकेटवर लाथ मारणे किंवा जाहिरात फलक, ड्रेसिंग रूमचे दरवाजे इत्यादींना नुकसान पोहोचवणे यांचा या कलमामध्ये समावेश आहे. पण इशानकडून नेमकी कोणती चूक झाली, ज्यामुळे हा दंड ठोठोवण्यात आला, याचा स्पष्ट उल्लेख आयपीएलने निवेदनात केलेला नाही. गेल्या काही सामन्यांमध्ये फलंदाजीमध्ये इशानला फारशी चांगली कामगिरी करता आलेली नाही. आजच्या सामन्यातही रोहित बाद झाल्यानंतर इशाननेही विकेट गमावली. इशान किशन सुरूवात चांगली करत असला तरी मोठ्या खेळीत त्याचे रूपांतर करण्यात अपयशी ठरत आहे. इशानने दिल्लीविरूद्धच्या सामन्यात १४ चेंडूत ४ चौकारांसह २० धावा केल्या आहेत. आतापर्यंत ९ सामन्यांत इशानने २१२ धावा केल्या आहेत.मुंबई इंडियन्स संघाला दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध १० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले आहे. या पराभवासह प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा अधिक धुसर झाल्या आहेत. पण मुंबईने त्यांच्या उर्वरित सर्व सामन्यांमध्ये विजय मिळवला तर त्यांना प्लेऑफमध्ये जाण्याची संधी मिळू शकते. दिल्ली विरूद्धच्या या सामन्यानंतर संघाचा विकेटकीपर फलंदाज इशान किशनला मोठा धक्का बसला आहे.

### 2.2 अंतर्गत लेव्हल 1 चा गुन्हा

» दिल्लीविरूद्धच्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी इशानवर कारवाई केली आहे. यासोबतच त्याला मॅच फीच्या १० टक्के दंडही ठोठावण्यात आला आहे. इशानने देखील आपली चूक मान्य केली आहे.आयपीएलच्या निवेदनानुसार, “किशनने आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा केला आहे. त्याने गुन्हा कबूल केला आहे आणि पंचांनी ठोठावलेला दंडही मान्य केला आहे.